Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या..... ४३८/५१

पञ्जिका संख्या..... २८५

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्राचे संजीवक

...३...



सार्वजनिक काका

गणेश वासुदेव जोशी

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां भारत स्वतंत्र झाला आहे. आपला महाराष्ट्रही पुनरपि स्वातंत्र्य भोगीत आहे. सतराव्या शतकांत छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें, तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. आपल्या मायभूमीला तिच्या हक्काचें तें सिंहासन परत मिळवून देण्यासाठीं जे कोणीं झटले व झगडले अशीं नररत्नें अनेक आहेत हें आपलें भाग्य होय.

स्वतंत्र वृत्ति व त्यागबुद्धि हे महाराष्ट्राचे विशेष गुण—त्याच्या सह्याद्रि-विंध्याद्रींइतकेच उत्तुंग व अभेद्य. ह्या गुणांची गरज स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं जितकी होती, तितकीच ह्यापुढेंही लागणार आहे. केवळ राजकीय पारतंत्र्य गेलें म्हणजे सर्वांगीण स्वातंत्र्य आलें असें थोडेंच आहे? आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि सर्व क्षेत्रांत आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें आहे, नवा महाराष्ट्र, नवा भारत उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेवलीं पाहिजेत. अनास्था, आळस व भोगलोलुपता ह्यांच्या चिखलांत तरुण महाराष्ट्रीयानें रुतून बसतां कामा नये. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नवीन पिढीच्या नसांतून खेळेल, तरच आपला महाराष्ट्र, आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण कसें होणार? एक मार्ग म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें समजावून सांगणें. महाराष्ट्राला आंग्लशाहींतून मुक्त करण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं लोकोत्तर गुण प्रगट केले, अशांचीं बारा चरित्रें, त्या त्या गुणांवर भर देऊन, लिहिण्याचें मीं योजिलें आहे. राजकीय दृष्टीनें मृतवत् झालेल्या महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या विभूतींचीं हीं चरित्रें त्याला नैतिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादि क्षेत्रांतही नवजीवन देण्यास समर्थ ठरतील असा मला विश्वास वाटतो. महाराष्ट्राच्या कुशींतून असे थोर पुरुष "झाले, आहेत, पुढें होणार" हा श्रीसमर्थांचा आशीर्वाद म्हणजे आपला संजीवनीमंत्रच आहे, नाहीं का?

दा. न. शिखरे

'महात्मा' कार्यालय, नातूबाग,
पुणें २, ता. १५ मे, १९५१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

2864

महाराष्ट्राचे
संजीवक
....३....

CHECKED 1973

सार्वजनिक काका

[ग. वा. जोशी]

ह्यांचे चरित्र १९८४-१९८५

लेखक

दा. न. शिखरे, एम्. ए.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

****

मूल्य आठ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रम

लोक-सेवेचा श्रीगणेशा	...	३
स्वदेशीचे अग्रदूत ...	...	९
लाखाची तार! ...	...	१८
किसानांची हाक ...	...	२४
क्रांतिकारकांचा पाठीराखा ...		३२
दुहेरी सत्य-निष्ठा ...	...	३९

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

पहिली आवृत्ति : १९५२

मुद्रक : वा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे
श्री समर्थ-सदन
गिरगांव, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



लोक-सेवेचा श्रीगणेशा

गोपाळमामा ह्या नांवाचा एक भला गृहस्थ पूर्वी बहुधा प्रत्येक गांवांत असे. त्याचें काम दुसऱ्याच्या उपयोगीं पडणें हेंच. गांवांत कोणाचें कांहींही अडलेलें असो, तेथें गांवमामा मदतीला हजर आणि ही सारी सेवा फुकट चालविलेली. तांबड्या पैशाचीही आशा नाहीं. सर्वांशीं गोड बोलावें आणि सर्वांच्या उपयोगीं पडावें, ह्यासाठींच जणूं त्याचा जन्म.

अशा निर्लोभी व परोपकारी वृत्तीनें, केवळ एका गांवाकडे नव्हे, तर सबंध महाराष्ट्राकडे पाहाणाऱ्या ज्या चारदोन व्यक्ति एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं जन्मास आल्या, त्यांमध्यें 'सार्वजनिक काका' ची गणना होते. त्यांच्या ठायीं दीनांविषयीं दया आणि अन्यायाची चीड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपरंपार असे. दरिद्री शेतकरी असो, नाहीं तर श्रीमंत संस्थानिक असो, कोणावरही जुल्म होत आहे, असें कानीं येतांच 'सार्वजनिक काका' सिंहाच्या छातीनें तेथें धावून जात. त्यांची राहाणी अत्यंत साधी असे; पण शमीच्या झाडाच्या ओबडधोबड सालीच्या आंत जसा अग्नि जळत असतो, तसा रसरशीत स्वाभिमान 'सार्वजनिक काकां'च्या नसानसांतून खेळत होता.

'सार्वजनिक काकां'चें नांव गणेश वासुदेव जोशी. त्यांचा जन्म सातारा येथें १८२८ सालीं, एप्रिल महिन्यांत झाला. न्यायमूर्ति रानडे ह्यांच्याआधीं चौदा वर्षें जन्मास आलेल्या गणपतरावांजवळ मोठी श्रीमंती नव्हती, विशाल विद्वत्ता नव्हती व सत्तेची आणि मानाची नोकरीही नव्हती. त्या वेळीं स्वराज्याची पहाटही झालेली नव्हती आणि स्वदेशीची भूपाळीही कोणाच्या ओठांवर गुणगुणत नव्हती. पेशवाईचा अस्त होऊन अवघीं दहा वर्षें झालेलीं, रावबाजीच्या अंदाधुंदीला लोक कंटाळलेले, स्वराज्य गेल्याचें दुःख फारसें कोणास नव्हतें, उलट सुराज्य मिळण्याची आशा मात्र ब्रिटिशांनीं भरपूर उत्पन्न करून ठेवली होती. ब्रिटिशांची शिस्त, सुव्यवस्था, स्वच्छता, वक्तशीरपणा, भौतिक विद्या, आधुनिक शस्त्रें, इत्यादि गुणांमुळें दिपून गेलेल्या हिंदी लोकांना त्या वेळीं वाटे, हे कोणी देवदूतच आले आहेत आपल्या उद्धारासाठीं! सारे लोक साहेबाला भिऊन–वचकून असत. आपलें काम साहेबापुढें हात जोडण्याचें, त्याचीं आर्जवें करण्याचें आणि तो देईल तें घेऊन, सांगेल तें काम उरकण्याचें, अशीच गुलामवृत्ति सर्वसामान्य हिंदी लोकांची झालेली होती. त्यांतही, ज्याच्या बुद्धींत कांहीं चमक असे, तो साहेबाची नोकरी पतकरी आणि स्वतःला सत्ता व संपत्ति खूप मिळवी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'सार्वजनिक काकां' चे वडील वासुदेवराव हे पुण्यास घर करून राहिले आणि वयाच्या पंचावन्नाव्या वर्षीं इंग्रज सरकारच्या 'सदर अमीन', (म्हणजे दिवाणी कोर्टाचे न्यायाधीश) ह्या नोकरीवर रुजू झाले. हल्लींच्या सबजज्जाइतका त्यांना मान होता. आठ वर्षें त्यांनीं ही नोकरी केली. गणपतरावांच्या जन्मानंतर दोन वर्षांनीं, १८३० सालीं, वासुदेवराव पुणें येथें मृत्यु पावले. त्यांच्या सेवेची कदर इंग्रज सरकारनें चांगली केली. त्यांच्या तिन्ही मुलांस, ते वयांत येईपर्यंत, दरमहा सोळा रुपये आणि त्यांच्या पत्नीस जिवंत असेपर्यंत दरमहा साडेसदतीस रुपये पेन्शन चालू ठेवलें. गणपतरावांची आई सावित्रीबाई. तिचें कृपाछत्रही त्यांना फक्त आठच वर्षें लाभलें. तोंपर्यंत गणपतरावांच्या स्वभावाला रंगरूप देण्याचें कार्य तिनें पार पाडलें.

गणेशानें आपल्या विद्येचा श्रीगणेशा साताऱ्यास गिरविला. त्या वेळीं सातारा येथें छत्रपतींचा अंमल चालू होता, इंग्रजांचा नव्हता. वयाच्या विसाव्या वर्षीं, १८४८ सालीं, गणपतराव पुण्यास आले आणि त्यांनीं इंग्रज सरकारच्या नाझर कचेरींत कारकुनीची नोकरी पतकरली. आठ वर्षें ती नोकरी त्यांनीं नेकीनें केली; पण त्यांच्यावर कोणीं कुभांड रचलें; लांच खाल्ल्याचा आरोप त्यांच्यावर आला. इंग्रज सरकारला आपला कारभार लोकप्रिय करावयाचा होता, निर्मळ ठेवावयाचा होता, पद्धतशीरपणें चालवावयाचा होता. आरोपाची सावलीसुद्धां आपल्या कारभारावर पडूं नये अशी दक्षता इंग्रज अधिकारी घेत; नाहीं तर त्यांच्या परकी अंमलाला दुष्पट विरोध व्हावयाचा. आधींच परराज्य आणि त्यांत कुराज्य असलें तर प्रजेची नाराजी सहजच वाढणार. ती टाळण्यासाठीं इंग्रजांनीं आपल्या राज्यकारभाराची घडी परीटघडीसारखी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वच्छ ठेवली होती. गणपतरावांच्या प्रामाणिकपणाविषयीं संशय घेण्यांत आला ना? लगेच त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं नोकरीवरून तात्पुरतें दूर केलें आणि चौकशी सुरू केली. चौकशीअंतीं गणपतराव पूर्ण निर्दोषी ठरले; तेव्हां वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांना पुन्हा नोकरीवर बोलावलें. पण गणपतरावांच्या बाणेदार मनानें त्यांना साफ नकार दिला.

खोट्या आरोपावरून नोकरी सुटतांच गणपतरावांनीं पुन्हा ताबेदारी न करण्याचें ठरविलें. त्यांनीं लगेच वकिलीचा स्वतंत्र व्यवसाय करण्याचें योजलें. त्याप्रमाणें अभ्यासास सुरुवातही केली. त्या वेळीं, म्हणजे १८५५ सालीं, वकिलीच्या परीक्षेस बसणारे लोक फार थोडे; दहापांच असतील,--नसतील. एका खोलींत परीक्षा झाली. परीक्षेंतील प्रश्नांचीं उत्तरें देतांना, अभ्यासाचीं पुस्तकें जवळ ठेवण्याची तेव्हां परवानगी असे. परीक्षा मराठींत झाली. निकाल ताबडतोब लागला. गणपतरावांना त्या वेळीं इंग्रजी येत नव्हतें; तें, ते पुढें शिकले. कोणाही गुरूच्या मदतीशिवाय व कोणत्याही क्रमिक पुस्तकाशिवाय इंग्रजी विद्येच्या समुद्रांत त्यांनीं प्रवेश केला. इंग्रजी वृत्तपत्रें व सरकारी अहवाल हेच त्यांचे पाठ्यग्रंथ आणि गुरु? स्वतःच! युरोपिअनाशीं वाद-संवाद करण्याइतकें इंग्रजी त्यांना येत होतें. ते वकील झाले आणि यशस्वी वकील ठरले. प्रारंभींच त्यांना गुंतागुंतीचे दोनतीन खटले चालवावयास मिळाले. त्यांत त्यांनीं आपल्या अक्कलहुशारीनें यश मिळविलें. त्यामुळें त्यांची कीर्ति चोहोंकडे पसरली. मोठमोठे सरदार—सावकार त्यांच्याकडे आपले खटले देऊं लागले. फौजदारी खटल्यांतही त्यांनीं चांगली कीर्ति कमावली. त्यांना वकिलींत खूप पैसा मिळूं लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पैसा मिळविण्यासाठीं गणपतरावांनीं कधीं कोणाला नाडलें नाहीं किंवा खोटेपणा आचरिला नाहीं. खोटेपणाची, अन्यायाची त्यांना चीडच होती. सरळ बाजू घेऊन लोकांना न्याय मिळवून द्यावयाचा ह्याच धोरणानें त्यांनीं वकिली चालविली. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें त्यांचा पोषाख मोठा डौलदार असे. रेशीमकांठी नागपुरी धोतर, कडकडीत छडीदार अंगरखा आणि डोक्यावर रंगीत पागोटें. अशा पोषाखानें गणपतराव कोर्टांत गेले कीं सर्वांना दरारा वाटे. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची छाप न्यायाधीशावर पडे. पहिलाच खटला त्यांना मिळाला तो मोठा भानगडीचा. पुण्यांतील कांहीं शास्त्रीमंडळींनीं अफरातफर केल्याबद्दलचा हा खटला होता. तो काकांनीं हातांत घेऊं नये असे प्रयत्न शास्त्रीमंडळींकडून करण्यांत आले, थोरामोठ्यांचें वजन आलें, पैशाचें आमिषही दाखविण्यांत आलें; पण काकांचें मन अग्नीसारखें तेजस्वी. त्यांनीं खटला चालविला व जिंकला. शास्त्रीमंडळींवरील आरोप सिद्ध केला. त्यामुळें काकांना शिष्टमंडळींत बरीच अप्रियता सोसावी लागली. पण वकिलीची कीर्ति फडकली.

दुसरा खटला काकांच्या सूक्ष्म बुद्धीची कसोटी पाहाणारा होता. पुण्यांतील बोहरी व्यापाऱ्याची बाजू त्यांनीं घेतली होती. उलट बाजूकडे एक दस्तैवज होता. तो कागद चीफ मॅजिस्ट्रेटच्या ताब्यांत ठेवलेला होता. केवळ दुरून तो कागद काकांना पाहावयास मिळाला. तेवढ्यांत काकांच्या कुशाग्र बुद्धीनें ताडलें कीं त्यावरील सही खोटी आहे. अक्षरांची लांबीरुंदी त्यांनीं हेरली आणि कोर्टांत ठामपणें सांगितलें कीं हा दस्तैवज खोटा आहे. तें खरें ठरून बोहरी निर्दोषी ठरला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

सरदार–राजे ह्यांच्या घराण्यांतील दोन अभागी अबलांना पेन्शन मिळवून देण्यासाठीं काकांची वकिली उपयोगीं पडली. त्यासाठीं त्यांनीं पै घेतली नाहीं एवढेंच नव्हे, तर स्वतःचाच पैसा खर्च केला. तसेंच, त्यांच्या दत्तकप्रकरणीं तंटा होता, तोही बुद्धिकौशल्यानें व निर्लोभीपणानें काकांनीं तोडला. अशा चतुराईनें, निर्भयतेनें व चोखपणानें काकांची वकिली एकसारखी भरभराटत गेली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वदेशीचे अग्रदूत

कोलंबसाची एक गोष्ट आहे ना ? त्यानें केवढ्या हिम्मतीनें, बहादुरीनें, जिवाच्या करारानें अमेरिका खंड शोधून काढलें. पण त्याचे कांहीं घरकोंबडे दोस्त चेष्टेनें म्हणाले, "ह्यांत काय मोठंसं ? आम्हींही अमेरिका शोधली असती." हा विनोद खाना खातां खातां चालला होता. तेव्हां खान्यांतील एक अंडें हातांत घेऊन कोलंबस आपल्या मित्रांना म्हणाला, "दोस्त हो, हें अंडं एवढं टेबलावर उभं करून दाखवा पाहूं." प्रत्येकानें इकडून तिकडून प्रयत्न करून पाहिला, पण तें निमुळतें अंडें कांहीं केल्या त्या सपाट टेबलावर उभें राहीना. तेव्हां कोलंबसानें, "आणा तें अंडं इकडे," असें म्हणून, सुरीनें तें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंडें थोडें छाटलें आणि टेबलावर उभें केलें. "वा ! ह्यांत काय मोठंसं ? हें आम्हींही केलं असतं." असें म्हणून दोस्तांनीं नाक उडविलें. पण खरा मान असतो आद्य कार्यकर्त्याला ! आतां गंगेचे कालवे कोणीं कितीही काढले तरी तिला भूतलावर आणण्याचें श्रेय राजा भगीरथाचेंच. आतां प्रचंड विमानें वायुवेगानें जगभर भरारत असलीं, तरी साधें विमान बनविणाऱ्या राइटबंधूंनाच अग्रमान दिला पाहिजे. पहिलें तारायंत्र एडिसनचें, पहिलें एंजिन वॅटचें, पहिला रेडिओ मार्कोनीचा, पहिली मोटर फोर्डची, म्हणून त्यांचें मानाचें स्थान उच्च व अढळ !

त्याप्रमाणें स्वदेशीचे पहिले पुरस्कर्ते 'सार्वजनिक काका'; किंबहुना सार्वजनिक जीवनाचें पहिलें उदाहरण म्हणजे काकांचें जीवन. परोपकारी साधुसंत पूर्वीपासून आहेतच ; पण राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा चळवळी नव्या पद्धतीनें करणें काकांच्या पूर्वी महाराष्ट्रांत माहीतच नव्हतें. तो कित्ता काकांनीं घालून दिला. स्वदेशीचें अंतिम स्वरूप म्हणजे खादी. ती एखाद्या धार्मिक व्रताप्रमाणें वापरण्याचा निग्रह त्यांनीं धरला आणि दिल्ली–दरबारांतही तो निग्रह मोठ्या धैर्यानें चालविला. गांधीजींच्या प्रयत्नामुळें खादीच्या चळवळीला महासागराचें स्वरूप आलें, पण तें पुढें ; परंतु खादीची गंगोत्री म्हणजे 'सार्वजनिक काका'च ! महाराष्ट्रांतच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानांत हातसुताची व हातविणीची खादी नखशिखान्त पेहेरण्याचा पहिला मान 'सार्वजनिक काकां'चा.

गणपतराव जोशी यशस्वी वकील म्हणून प्रख्यात होते. त्यांना 'सार्वजनिक काका' ही पदवी १८७० नंतर मिळाली व ती महाराष्ट्रांत मान्यता पावली. ह्या पदवीचा जन्म 'सार्वजनिक सभा'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या संस्थेमुळें झाला. ही संस्था ता. २ एप्रिल, १८७० रोजीं, पाडव्याच्या मुहूर्तावर, औंधकरांच्या वाड्यांत, श्रीमंत श्रीनिवासराव पंतप्रतिनिधि ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झाली. कशासाठीं? तर त्या वेळीं पर्वती संस्थानच्या कारभारांत कांहीं घोटाळा झाला होता, त्याची चौकशी करण्याच्या निमित्तानें. हिंदु–मुसलमान, संस्थानिक–सरकारी नोकर, श्रीमंत-गरीब, वगैरे सर्व वर्गांची प्रातिनिधिक अशी ही संस्था होती. ह्या सभेचे नियम व संघटना गणपतरावांनींच तयार केली. तिचे पहिले चिटणीस जोशी व गोवंडे. पुढें तें चिटणिशीचें स्थान मोठमोठ्या पुढाऱ्यांनीं भूषविलें. पण 'सार्वजनिक काका' हे त्या संस्थेचे आमरण आधारस्तंभच होते. पुढील वर्षीं तर न्या. रानडे हे महापुरुष त्या संस्थेमध्यें लक्ष घालूं लागले. 'सार्वजनिक काका' व न्या. रानडे म्हणजे ह्या संस्थेचे शरीर व प्राण ठरले.

त्या दोघांनीं मिळून सभेच्या कार्याचा व्याप पर्वतीपुरता न ठेवतां महाराष्ट्रापर्यंत वाढविला; किंबहुना अखिल हिंदुस्थानच्या प्रश्नापर्यंत तिची आकांक्षा पसरली. सार्वजनिक सभेचें रोप महाराष्ट्रभूमींत लावण्याचें व त्याला खतपाणी घालण्याचें आरंभींचें कष्टाचें सारें काम 'सार्वजनिक काकां'नींच केलें.

परदेशी राज्य, परदेशी विद्या, परदेशी संस्कृति, ह्या सर्वांची मोहिनी हिंदी लोकांवर पडली होती. त्या मूर्च्छेंतून त्यांना जागे करण्याचें कार्य न्या. रानडे ह्यांनीं केलें. १८७२ च्या डिसेंबरांत व १८७३ च्या फेब्रुवारींत अशीं दोन व्याख्यानें त्यांनीं स्वदेशीवर दिलीं. तीं अत्यंत परिणामकारक झालीं. त्यांत त्यांनीं श्रोत्यांना ही जाणीव दिली कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

"यंत्रसामर्थ्यानें सर्व सोयींचे व चोकांचे पदार्थ तयार होतात. ते आपण आवडीनें भोगतों. पण आपल्या समृद्ध देशांत सर्व पदार्थ तयार करतां येऊं नयेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. एकंदरींत दिवसेंदिवस पराधीनपणाची आणि निःसत्त्वपणाची दशा देशास प्राप्त होत आहे, ही अनिष्ट गोष्ट आहे!" व्याख्यानाला तरुणांच्या झुंडीच्या झुंडी आल्या होत्या असें म्हणतात. परंतु त्यांतील तत्त्वांना कृतीचें रूप दिलें दोघांनींच. ते दोघे म्हणजे ४५ वर्षांचे सार्वजनिक काका आणि २८ वर्षांचे वासुदेव बळवंत फडके. दोघांनींही घरीं येतांच विदेशी वस्तूंचा त्याग केला आणि साधे, जाडेभरडे स्वदेशी कपडे वापरण्यास सुरुवात केली.

'ऐक्य–वर्धिनी' ह्या नांवाची एक संस्थाही खास स्वदेशीसाठीं स्थापन झाली. काकांनीं 'देशी व्यापारोत्तेजक मंडळ' नांवाची एक निराळी संस्था काढली आणि तिच्यामार्फत स्वदेशी वस्तूंचीं दुकानें जागोजाग उघडलीं. देशी वस्तूंचीं प्रदर्शनें भरविण्यांत आलीं. देशी वस्तुसंग्रहालयेंही उघडण्यांत आलीं. 'स्वदेशी माल ओबडधोबड आणि त्यांत महाग. त्याला उत्तेजन देणें म्हणजे संस्कृतीची हानि करणें होय, नव्या यंत्रशास्त्राचा अनादर करणें होय आणि आपल्या बांधवांवर आर्थिक बोजा टाकणें होय,' असे नाना आक्षेप काकांच्या उद्योगावर घेण्यांत आले. पण त्यांचें खंडन काकांनीं आपल्या वाणीनें व कृतीनें केलें.

काकांना स्वदेशी पोषाखांत पाहून कांहीं आप्तेष्टांनीं त्यांची चेष्टा केली. कारण काकांचें रेशीमकांठी धोतर जाऊन खादीचें दाभणकांठी धोतर आलें होतें; पहिलें पैठणी पागोटें जाऊन डोक्यावर साधें कंदी पागोटें आलें होतें आणि पहिला छडीदार उंची अंगरखा जाऊन जाडाभरडा खादीचा अंगरखा आला होता. सरदारीच्या रुबाबावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैराग्याची कळा आली हें काकांच्या सुखलोलुप नातलगांना आवडलें नाहीं. त्यांना हे भिकेचे डोहाळे वाटले, दारिद्र्याचें लक्षण वाटलें. पण काकांची पक्की खात्री पटली होती कीं खादी भीक घालविणारी आहे, दारिद्र्य हटविणारी आहे. इंग्रजांची आर्थिक गुलामगिरी तोडण्याचें एक शस्त्र म्हणजे स्वदेशी आणि स्वदेशीचें संपूर्ण व शुद्ध स्वरूप म्हणजे खादी, असा त्यांचा दृढ विश्वास होता.

त्यांनीं ता. १२ जानेवारी, १८७२ रोजीं स्वदेशीची शपथ घेतली आणि ती आमरण निश्चयानें पाळली. स्वतः सूत कातून, तें घरच्या हातमागावर विणून त्या खादीचे कपडे वापरणारे पहिले महाराष्ट्रीय म्हणजे सार्वजनिक काकाच! पुढें डॉक्टरांनीं त्यांना हृदयाचा विकार झाल्यामुळें छातीवर फ्लॅनेलचा ऊबदार कपडा वापरण्याचा आग्रह केला. पण फ्लॅनेल परदेशी असल्यामुळें त्यांनीं ती वापरली नाहीं. काकांनीं स्वदेशीचें व्रत मोठ्या निश्चयानें पाळलें. त्यासाठीं त्यांनीं आपल्या घरीं देशी मागाचा कारखानाही काढला. काड्यांच्या पेट्या व छत्र्या तयार करण्याचेही कारखाने त्यांनीं आपल्या घरीं उघडले. पण हे कारखाने म्हणजे नफ्याचे खजिने नव्हते. त्यांत त्यांना झीजच सोसावी लागली. शिवाय स्वदेशीच्या प्रसारासाठीं त्यांनीं आपला वकिलीचा धंदा संपुष्टांतच आणला होता. काकांनीं स्वदेशीसाठीं फार मोठा स्वार्थत्याग केला.

स्वदेशीचा झेंडा दिल्लीवर रोवण्याची 'राघोभरारी' काकांनीं पुढें मारली. १८३७ सालीं इंग्लंडमध्यें व्हिक्टोरिआ राणी राज्यावर आली. सन १८५७ सालीं हिंदुस्थानांत स्वातंत्र्ययुद्ध झालें. त्या वेळीं लष्कराची उठावणी, धार्मिक आंदोलन व राजकीय क्रान्ति अशा तिन्ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्वाला भडकल्या होत्या. सैनिकांप्रमाणेंच संस्थानिकांनींही त्यांत आपली आहुति दिली होती. ब्रिटिशांनीं ती क्रान्ति क्रूरपणें मोडून काढली एवढेंच नव्हे, तर पुन्हा तसा सुरुंग आपल्या राज्याला लागूं नये म्हणून गोड व तिखट उपाय ते योजूं लागले. त्यांपैकीं एक म्हणजे इंग्लंडच्या 'राणीला' हिंदुस्थानची 'बादशाहीण' म्हणून पुकारणें. 'सारा हिंदुस्थान आमच्या मालकीचा आहे, आमचा तावेदार आहे, आमचा गुलाम आहे,' असा डंका जगांत पिटण्यासाठीं राणी व्हिक्टोरिआला 'हिंद-सम्राज्ञी' असा किताब देण्याचें ब्रिटिश प्रधानमंडळानें ठरविलें. पण हें हिंदी लोकांना कसें कळणार आणि त्यांच्यावर दरारा कसा बसणार? त्यासाठीं इंग्रजांनीं एक युक्ति काढली. ती म्हणजे दिल्ली येथें ता. १ जानेवारी, १८७७ रोजीं एक बडा दरबार भरविणें.

देशांत दुष्काळाचें थैमान चालू होतें. हजारों माणसें 'अन्न! अन्न!' करीत प्राण सोडीत होतीं. पण तरीही लाखों रुपये खर्चून दिल्ली-दरबारचा सोहळा साजरा करण्यांत आला. गुलाम बनलेल्या संस्थानिकांना दिल्लीस पाचारण केलें होतें. उंची उंची पोषाख घालून आणि हिऱ्यांमोत्यांचे अलंकार धारण करून हिंदुस्थानांतील राजे-महाराजे दिल्ली-दरबाराला शोभा आणीत होते. आपल्या कृत्याला हिंदी जनतेचाही पाठिंबा आहे, हें दाखविण्यासाठीं लोकांच्या कांहीं संस्थांनाही सरकारनें निमंत्रण दिलें होतें. त्याप्रमाणें तें पुण्याच्या 'सार्वजनिक सभेसही' आलें होतें. त्या सभेतर्फे एक शिष्टमंडळ दिल्लीस गेलें होतें. त्या शिष्टमंडळांत 'सार्वजनिक काका'च प्रमुख होते. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं त्या बड्या बादशाही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

दरबारांतही काका दाखल झाले ते आपल्या अस्सल स्वदेशी पोषाखांतच, स्वतः कातलेल्या व घरीं विणलेल्या खादीच्या ओवडधोवड पोषाखांतच ! 'ह्याच खादीच्या सुतानें आम्ही स्वराज्याचा स्वर्ग गांठूं, ह्या स्वदेशीच्या भावनेंतूनच आम्ही आमचें स्वराज्य मिळवूं' अशी सूचनाच जणूं कांहीं काकांनीं त्या दरबारांत ब्रिटिश राज्यकर्त्यांना दिली. सत्तर वर्षांनीं कां होईना, पण काकांचा हा संकल्प सिद्धीस गेला आणि देश स्वतंत्र झाला. त्याच्या आधीं, दिल्ली व सिमला येथें, ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या डोळ्यांना खादीचें दर्शन गांधीजींनीं घडविलें, पण काकांनंतर पन्नास वर्षांनीं. दिल्लीच काय, पण लंडनच्या राजवाड्यांतही ह्या 'नंग्या फकिरानें' खादीची ध्वजा फडकविली. पण हें सारें पुढचें रामायण. समुद्रावरून पहिली उडी मारणाऱ्या मारुतीची कर्तबगारी केव्हांही थोरच. तशीच आघाडीची कर्तबगारी स्वदेशीच्या बाबतींत सार्वजनिक काकांनीं दाखविली, हें विशेष.

दिल्ली–दरबारासाठीं गोळा झालेल्या राजे–रजवाड्यांना भेटून काकांनीं त्यांना देशभक्तीचा उपदेश केला. त्या वेळीं तसा मोघम उपदेश करणें-सुद्धां धोक्याचें होतें. पण काकांजवळ तें धैर्य होतें आणि त्यांचा तसा अधिकारही मानला जात असे. त्यांनीं संस्थानिकांना कळवळून सांगितलें, "राजे लोक हो ! आपण आपल्या प्रजेचे मायबाप आहांत. तिची सेवा हेंच आपलें पवित्र कर्तव्य. वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवा आणि प्रजेचा उत्कर्ष साधा. आपआपसांतील कलह टाळा आणि अखिल राष्ट्राच्या कल्याणाकडे लक्ष द्या." काकांच्या भाषणाबद्दल शिंदे, होळकर, वगैरे महाराजांनीं त्यांना धन्यवाद दिले. जेथें जेथें राष्ट्रसेवेची संधि मिळेल, तेथें तेथें काका जीव तोडून काम करीत. संस्थानिकांचें ऐक्य असो किंवा स्पृश्यास्पृश्यांचें सख्य असो, काकांना दोन्ही कामें सारखींच प्रिय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचीही उन्नति व्हावी अशी त्यांना तळमळ. त्यामुळें त्यांनीं १८७१ सालीं, 'स्त्री-विचारवती सभा' ह्या नांवाची संस्था स्थापन केली. तिच्या बैठकी वारंवार भरत. बैठकींना स्त्रिया किती हजर राहात? तर सात-आठ. पण नदीचें मूळ करांगुळीएवढेंच असतें. काकांच्या पत्नी सरस्वतीबाई ती सभा चालवीत आणि स्त्री-शिक्षणाचा फैलाव करीत. ह्या संस्थेनें ता. २५ एप्रिल, १८७३ रोजीं एक प्रचंड क्रान्ति-कार्य केलें. तें म्हणजे सार्वजनिक हळदीकुंकूं. काकांनीं आपल्या आईच्या इच्छेवरून १८६८ सालीं एक विष्णुमंदिर बांधलें. तेथल्या जागेला त्या वेळीं 'काळेवावर' असेंच म्हणत. आतां त्या मंदिराला 'नव्या विष्णूचें देऊळ' असें म्हणतात. त्या विष्णुमंदिरांत सार्वजनिक हळदीकुंकवाचा हा पहिला समारंभ साजरा झाला. निमंत्रण-पत्रिका वांटण्यांत आल्या होत्या. 'बारावर दोन वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत स्त्रियांनीं यावें' असें निमंत्रण-पत्रिकेंत लिहिलें होतें. त्याप्रमाणें बायकाही खूप जमल्या. खूप म्हणजे किती? तर ५००० ! आणि त्याही ब्राह्मण, मराठे, वगैरे सर्व जातींच्या. फार काय, अस्पृश्य भगिनीही आल्या होत्या.

त्या वेळीं शिवाशिवीचें बंड फार होतें. देशस्थ-कोंकणस्थ अशांचेही अन्न-लग्न-व्यवहार होणें कठीण; ब्राह्मण-मराठे स्त्रिया एकमेकींना शिवतही नसत आणि महार-मांगांची सावलीही स्पृश्यवर्ग दुरूनसुद्धां अंगावर घेत नसे. अशा कडक सोवळ्याच्या काळांत, पांच हजार महिलांचा मेळावा एकत्र आणणें, ही मोठी मर्दुमकी होती. काकांनीं ती मर्दुमकी गाजवून, सामाजिक सुधारणेची तुतारी फुंकली. भिकारदास गेटाजवळ अस्पृश्य भगिनींना हळदीकुंकूं देण्यांत आलें. एकूण आठ पल्ले हरभरे लागले. पाण्याच्या हौदांत हरभरे भिजवलेले होते. सर्व समारंभास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खर्च आला शंभर रुपये. त्या वेळच्या मानानें शंभर रुपये हा आंकडा फार मोठा होता.

स्वदेशीमुळें आर्थिक समता, तशी जातीय ऐक्यामुळें सामाजिक समता ह्यांचा अरुणोदय सार्वजनिक काकांनीं घडविला. जातीय ऐक्य साधण्यासाठीं त्यांनीं दसऱ्याची मिरवणूक काढली, तसेंच पुण्याजवळील पाषाणच्या यात्रेसही सर्वांनीं जाण्याचा पायंडा पाडला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



लाखाची बात!

वैजनिक काकांची धडाडी बडोद्याच्या महाराजांनाही उपयोगीं पडली. त्या वेळची परिस्थिति म्हणजे पारतंत्र्याची अमावास्याच होती. धैर्याचा, स्वाभिमानाचा, प्रतिकाराचा चंद्रप्रकाश कोठेंच दिसत नव्हता. सर्वत्र गडद अंधार. त्या अंधारांत गोरे तारे सूर्याच्या ऐटीनें लुकलुकत. एखादा फाटका साहेब असला तरी तो सुलतानाची मिजास भोगी. ब्रिटिश अधिकारी स्वतःला संबोधीत होते 'देवदूत' म्हणून, पण वागत होते मात्र सैतानासारखे. त्यांच्या अरेरावीविरुद्ध ब्र काढण्याची छाती कोणास होत नसे. सत्तावन्न सालच्या क्रान्तियुद्धानंतर त्यांनीं दडपशाहीचा नांगरच साऱ्या महाराष्ट्रावर फिरविला होता. सूर्यचंद्रांवर आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वंशाची वेल नेऊन भिडविणारे हिंदी राजेमहाराजेसुद्धा लुंग्यासुंग्या गोऱ्या अधिकाऱ्यांपुढें चळचळां कांपत. ते राजे होते पण बुद्धिबळांतले, सिंह होते पण सर्कशींतले, निखारे होते पण विझलेले !

एकामागून एक संस्थानें खालसा करण्याचा सपाटा ब्रिटिश सरकारनें चालविला होता. संस्थानिकांचा सत्यानाश चुटकीसरसा करण्याची चटकच जणूं ब्रिटिश साम्राज्यशाहीस लागलेली होती. सातारा येथील छत्रपतींची गादी म्हणजे महाराष्ट्राच्या भक्तिभावाचें केवढें स्थान ! पण ती गादीसुद्धां १८४८ सालीं झट्दिशीं रद्द करण्यांत आली. वीज कडाडावी तशी ब्रिटिश सत्ता हिंदी संस्थानांवर कोसळत होती — त्यांना करपवून टाकीत होती — त्या अर्ध्यामुर्ध्या स्वराज्याचे कोळसे करून टाकीत होती. ह्या सुलतानी सत्तेचा उपयोग आपल्याला वाटेल त्या पद्धतीनें करणारे गोरे अधिकारीही त्या वेळीं थोडे नव्हते. कर्नल फेर हा त्यांपैकींच एक होता. १८७३ सालीं बडोद्याचा रेसिडेंट म्हणून त्याची नेमणूक झाली. रेसिडेंटचें काम अलिप्तपणाचें, महाराजांना सल्लामसलत देण्याचें. पण ह्या फेरसाहेबानें आपल्या अधिकाराचें अतिक्रमण केलें आणि बडोदें संस्थानचा सारा कारभार नासून — विघडवून टाकला.

फेरसाहेबाला आपल्या दुष्ट लीला करावयास योग्य अशीच परिस्थिति त्या वेळीं बडोद्याची होती. शरीर दुबळें झालें म्हणजेच रोगजंतु जोर करतात आणि नदीचें पाणी गढूळ झालें म्हणजेच त्यांतील मासे धरण्यास कोळी लोक आपलें जाळें फेकतात. बडोद्याच्या गादीवर १८७० सालीं बसलेले मल्हारराव महाराज गायकवाड म्हणजे पूर्वीच्या संभाजीचा छोटा अवतार होते. आपल्याला आधींच राज्य मिळावें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून ह्या मल्हारराव‌ांनीं पूर्वीच्या महाराजांना विष घालून ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. त्याची अद्दल म्हणून पूर्वीच्या महाराजांनीं मल्हारराव‌ांस कैदेंत ठेवलें होतें. पुढें पहिले महाराज वारले आणि मल्हारराव गादीवर आले. तेव्हां त्यांनीं जुन्या कारभाऱ्यांचा सूड उगवण्यास सुरुवात केली. जुने कसलेले अधिकारी काढले आणि त्यांच्या जागीं आपले होयबा नेमले. राज्याची घडीही विसकटून टाकली. भलत्याच गोष्टींना नसतें महत्त्व आलें. दरबारांत आपण गव्हर्नरच्या उजव्या हातास बसावयाचें का गव्हर्नरनें आपल्या उजव्या बाजूस बसावयाचें, हाच वाद छोट्या-बड्या लाटांपर्यंत नेण्यांत आला. खालचे संस्थानी अधिकारी नाराज आणि वरचे ब्रिटिश अधिकारीही नाराजच. अशा कात्रींत सापडलेल्या मेणचट मल्हारराव‌ाचा चोळामोळा करण्यास फेरसाहेबास कितीसा वेळ लागणार ? त्याला हवीं तितकीं निमित्तें सापडलीं.

एकदा फेरसाहेबाच्या रेसिडेन्सींतील एक युरोपिअन डॉक्टर रस्त्यावरून गाडींतून चालला होता. समोरून मल्हारराव‌महाराजांची स्वारी येत होती. त्यांच्या स्वारानें डॉक्टराच्या गाडीवानास सांगितलें, " तुमची गाडी बाजूला घ्या व महाराजांस मान द्या. " संस्थानांत संस्थानिकाचा मान सर्वांत उच्च असे. संस्थानिक सहज सहलीला निघाले तरी रस्ते रोखले जात आणि दुकानांतील व्यापारी भराभर बाहेर येऊन, जमिनीला हात लावून वंदन करीत. पण गोरे लोक जेते ! त्यांना ' काळ्या आदमीची ' पर्वा काय ? मग तो राजा असो नाहीं तर महाराजा असो. फेरसाहेबाला हा डॉक्टराचा वृत्तान्त कळतांच त्यानें महाराजांना बजाविलें, " तुमच्या स्वारानें आमच्या डॉक्टराचा अपमान केला. अर्थात त्याला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपली प्रेरणा असली पाहिजे. तेव्हां ह्या अपराधाची जबाबदारी तुमच्यावर आहे. म्हणून तुम्हीं डॉक्टराची माफी मागणें जरूरीचें आहे." बिचारे महाराज! आपल्या नातलगांना व प्रजाजनांना ते कितीही डसत असले, तरी गोऱ्या गारुड्यानें त्यांना पेटाऱ्यांत घालून ठेवलेलें होतें. त्यांनीं त्या गोऱ्या डॉक्टराची सपशेल माफी मागितली.

बडोद्यांतील रयतेच्या तक्रारी फेरसाहेब ऐकूं लागला. वास्तविक त्याला तसा अधिकार नव्हता, पण तो दडपून लोकांच्या फिर्यादी स्वीकारी आणि त्यांच्या आधारावर मल्हारराबांना दमदाटी देई आणि तीही अत्यंत उद्दाम भाषेंत. त्यानें मुंबई सरकारकडेही महाराजांविरुद्ध कागाळी केली! तेव्हां मुंबई सरकारनें एक चौकशीकमिशन नेमलें! त्या कमिशनच्या अहवालावरून सरकारनें महाराजांना कळविलें, "तुम्हांला आपला कारभार सुधारण्यास दीड वर्षाची मुदत देण्यांत येत आहे." ह्या मुदतींत आपला कारभार सरकारला पसंत पडण्यासारखा न झाला तर संस्थानच खालसा होण्याची भीति आहे, हें ओळखून मल्हारराबमहाराजांनीं एक उत्कृष्ट दिवाण नेमला. त्याचें नांव दादाभाई नौरोजी. पण त्यांचे कागदपत्रच फेरसाहेबानें दडपून टाकले. तेव्हां बाणेदार दादाभाईंनीं दिवाणगिरीचा राजीनामा दिला. महाराजांनीं लगेच दिल्लीच्या गव्हर्नर-जनरलकडे फेरसाहेबाविरुद्ध कागाळी केली. फेरसाहेबाची अरेरावी उजेडांत आली व त्याला ठपका आला.

त्यामुळें तो सुधारला काय? नरम आला काय? छेः! उलट सापाच्या शेपटीवर पाय पडल्यासारखी त्याची स्थिति झाली. तो चिडला, चरफडला आणि ता. ९ नोव्हेंबर, १८७४ रोजीं त्यानें मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

सरकारास तारेनें कळविलें कीं महाराजांनीं माझ्यावर विषप्रयोग करण्याचा कट केला ! सरकारनें महाराजांना पदच्युत केलें, त्यांची खाजगी जिंदगी जप्त केली आणि त्यांच्या चौकशीसाठीं स्वतंत्र कमिशन नेमण्याचें ठरविलें !

बडोद्याचे महाराज इंग्रजांच्या कैदेंत पडले ! बचाव करण्यासाठीं त्यांच्याजवळ पैसा नव्हता. 'बचावासाठीं दोन लाख रुपये मला द्या' अशी विनवणी महाराजांनीं इंग्रज सरकारकडे केली. पण ती फोल ठरली. संस्थानांत वीस लाख लोक राहात होते. त्यांत कैक सधन होते, राजनिष्ठही होते, पण महाराजांना पैसा देण्यास एकजणही पुढें आला नाहीं. इंग्रजांचा दरारा च तसा होता. जो तो साहेबाला भिई. पण महाराष्ट्राचा पिंड वेडर. 'सार्वजनिक काकांनीं' ब्रिटिशांची भीति न बाळगतां मल्हारराव महाराजांस तार ठोकली, " आपल्या बचावासाठीं महाराष्ट्र एक लाख रुपये देण्यास तयार आहे. " तशीच दुसरी तार त्यांनीं व्हाइसरॉयास पाठविली कीं महाराजांस कायदेपंडितांचें सर्व सहाय्य द्या ; त्यासाठीं लाख रुपये आम्ही देऊं.

मनुष्यबळाचाही पुरवठा महाराजांना करण्यासाठीं सार्वजनिक काकांनीं पुण्यांत एक जाहीर सभा बोलाविली. ता. १८ जानेवारी, १८७५ रोजीं सार्वजनिक सभेच्या वतीनें भरलेल्या ह्या सभेनें महाराजांना खुला न्याय मिळावा अशी मागणी केली. त्याचप्रमाणें 'सार्वजनिक सभेनें' गव्हर्नर-जनरल ह्यांस एक खलिता पाठविला. महाराजांच्या चौकशीसाठीं सरकार जें कमिशन नेमील, त्यांत हिंदी न्यायाधीशही गोऱ्यांइतके घ्यावेत आणि कांहीं झालें तरी बडोदें संस्थान खालसा करूं नये, अशा दोन मागण्या 'सभेनें' केल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

ह्या अर्जाचा परिणाम होऊन सरकारनें ह्या दोन्ही मागण्या पूर्ण केल्या. शेवटीं महाराजांना आमरण मद्रास येथें कैदेंत राहावें लागलें ही गोष्ट निराळी. पण त्यांना रास्त न्याय मिळण्यासाठीं लोकमत व द्रव्यनिधि, दोन्ही उभे करणें आणि त्या कामीं ब्रिटिश राज्यकर्त्यांची भीति न बाळगणें हें कर्तव्य सार्वजनिक काकांनीं व त्यांच्यामुळें महाराष्ट्रानें पार पाडलें. अशी निर्भय व निःस्पृह कर्तव्यनिष्ठा इतिहासांत क्वचितच आढळते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



किसानांची हाक

सार्वजनिक काकांना सार्वजनिक कामांचा दुष्काळ कधींच पडला नाहीं. दुष्काळाचें काम, बडोदें प्रकरणांतून मुक्त होतांच, त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभें राहिलें. दुष्काळ पडणें हें निसर्गाच्या कोपाचें फळ. पण तो टाळणें किंवा त्याचे कांटे बोथट करणें हें सरकारचें कर्तव्य. परंतु परक्या सरकारला आपल्या कर्तव्याची इतकी जाणीव कुठली ? उलट नैसर्गिक आपत्तीच्या आगींत सरकारी अन्यायाचें तेलच ओतलें जाई.

आधींच आमचा शेतकरी दरिद्री, अडाणी व भोळा. त्यांत इंग्रज सरकारनें त्याला पिळून काढून इंग्लंडला पुष्ट करण्याचें धोरण ठेवलें होतें. धोबी जसा गाढवाची काळजी आपला भार वाहण्यापुरतीच घेतो,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याप्रमाणें इंग्रज सरकार हिंदी शेतकऱ्याला वागवीत असे. जमिनीचा सारा इंग्रज सरकारनें वाढविला आणि तो सारा पैशाच्या रूपानें वसूल करण्याची पद्धत सुरू केली. धान्याच्या रूपानें व पिकाच्या मानानें सारा वसूल होणें शेतकऱ्याला सोयीचें व हिताचें. पण सरकारला पाहावयाची होती स्वत:ची सोय व स्वत:चें हित. म्हणून त्यांनीं सारा वाढविला व तो पैशाच्या रूपानें वसूल करण्याचा सपाटा लावला.

सारा भरण्याच्या वेळीं पैसा गांठीं हटकून असावा इतकी श्रीमंती शेतकऱ्यांची कोठली असते ? साऱ्यासाठीं शेतकऱ्याला सावकाराचे पाय धरावे लागत. सावकार काय ? पैसे कमवायलाच बसलेले. रसाचा थेंबन् थेंब निघेपर्यंत जसा चरक उसाला पिळून काढतो, तसा सावकारवर्ग शेतकऱ्याचें नि:शेष शोषण करीत असे. व्याजाचे दर भरमसाट असत आणि ते वसूल करण्यासाठीं हवे ते उपाय योजले जात. शेतकऱ्यांचीं भांडींकुंडीं, नांगर-औत, सर्व कांहीं लुबाडलें जाई. बायकांची अब्रूही मातीस मिळे. ह्या वाढत्या हालांमुळें महाराष्ट्रांतील शेतकरीवर्ग चिडून-संतापून बेफाम बनला. त्यानें दंगे माजविले.

पुणें जिल्ह्यांतील सुपें गांवीं बाजारचा दिवस होता. आजूबाजूचे शेतकरी पुष्कळच जमले होते. एकाएकीं लुटालुटीस सुरुवात झाली. दुकानांतील धान्य व कापड रस्त्यावर फेकण्यांत आलें. सावकाराजवळील कर्जरोखे, गहाणखतें, वगैरे कागदपत्र बाहेर काढून पेटवून देण्यांत आले. कांहीं क्रूर सावकारांचे नाक-कानही छाटण्यांत आले. हें कळतांच पुण्याहून पोलीस व लष्कर दौडत गेलें. शंभर शेतकऱ्यांना पकडलें. त्यांना शिक्षा ठोठावण्यांत आल्या. पण असंतोषाचा अग्नि धुमसतच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिला. इतर गांवीं शेतकऱ्यांचे दंगे उसळले. नगर, नाशिक, खानदेश, सोलापूर ह्या जिल्ह्यांतही दंग्याच्या ज्वाळा पेटल्या.

दंगलीला दंडेलीनें उत्तर देण्याचा दंडक फोल आहे, असें सार्वजनिक काकांना वाटलें. दंग्याचें मूळ कारण म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा. तो आधीं दूर केला पाहिजे असें निदान काकांनीं केलें. त्यांनीं 'सार्वजनिक सभे'च्या वतीनें 'दख्खनच्या दंग्याची' चौकशी करून सरकारकडे एक खलिता पाठविला. शेतकऱ्यांस शिक्षण मिळावें, शेतकी-शिक्षणाचे वर्ग जागोजाग काढून ते हायस्कुलांस जोडावे, शेतकऱ्यांस कर्ज देण्यासाठीं पेढ्या काढाव्या आणि रोखे-कागद कसेही असले तरी शेतकऱ्यावर फिर्याद झाली असतां न्यायाधीशानें शेतकऱ्याच्या वतीनें कसोशीनें सर्व व्यवहार पाहावा आणि निकाल द्यावा, अशा प्रकारचे सवलतीचे कायदे करावे म्हणून त्यांनीं खटपट केली. काकांच्या ह्या खटपटीचा परिणाम 'दक्षिणेतील शेतकऱ्यांचा कायदा' ह्या रूपानें झाला. नुसता कायदा घडवून आणून काका स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं त्याचा लोकांत प्रचार केला. त्यासाठीं काम करण्याला माणसें तयार केलीं.

दंग्याचे निखारे कसेबसे विझतात न विझतात तोंच महाराष्ट्रांत दारुण दुष्काळ पडला. १८७६ सालीं पावसानें डोळे वटारले. शेतीला पाणी मिळालें नाहीं. विहिरी व तळीं कोरडीं ठणठणीत पडलीं. माणसांना धान्य व गुरांना चारा मिळेनासा झाला. कडबा सोन्याच्या भावानें व गुरें मातीच्या मोलानें विकलीं जाऊं लागलीं. मायेचे पाश तटातट तोडून आईबाप मुलांना सोडून जाऊं लागले. मृत्यूची छाया साऱ्या महाराष्ट्रावर पसरली. खेड्यांतून शहरांकडे निघालेले भुकेलेले लोक रस्त्यावरच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मरून पडूं लागले. एकट्या सोलापूर शहरांत असे पंचवीस हजार उपाशी खेडूत 'अन्न अन्न' करीत आले होते, असें वर्णन त्या वेळच्या 'टाइम्स' पत्रांत आलें आहे. तेथेंही पोटाला कांहीं मिळेना म्हणून तीं बिचारीं माणसें निजामच्या राज्याकडे निघून गेलीं. शक्य तेथें हे लोक धान्याची लुटालूट करीत. हाडांचे सांपळे मृत्यूच्या वाटेनें चालल्याचें भीषण दृश्य महाराष्ट्रांत चोहोंकडे दिसूं लागलें.

वावटळीनें वणवा भडकावा, त्याप्रमाणें देवी व पटकी ह्या रोगांनीं दुष्काळाचे चटके अधिकच तीव्र केले. ह्या दुहेरी होळीवर आपल्या धर्माची पोळी भाजून घेण्यास ख्रिश्चन मिशनरी पुढें सरसावले. जो ख्रिस्ती होईल त्याला ते अन्नपाणी देऊं लागले. त्यांच्या पाठीशीं अमाप पैसा होता, प्रत्यक्ष राजसत्ताच होती. पुणें येथें 'अनाथ अर्भकालय' मिशनऱ्यांनीं चालविलें होतें. त्यांत अशी जाहीर अटच होती कीं 'येथें येणारीं मुलें ख्रिश्चन बनविलीं जातील'.

प्राण व प्राणापलीकडील धर्म, ह्या दोहोंवरही त्या वेळीं गदा आली होती. अशा प्रसंगीं 'सार्वजनिक काकांना' स्वस्थ कसें बसवेल? त्यांच्या जिवाची घालमेल झाली. 'सार्वजनिक सभे' तर्फे त्यांनीं दुष्काळी भागांत प्रचारक पाठवून दिले आणि खरी माहिती गोळा केली. न्या. रानडे ह्यांच्या साहाय्यानें ती सारी माहिती त्यांनीं सरकारच्या कानांवर घातली आणि त्याबरोबरच योग्य उपाय योजण्यास सुचविलें. सरकारनें दुष्काळी कामें काढलीं होतीं. पण तेथें माणशीं रोज फक्त अर्धा शेर धान्य मिळे आणि काम फार करावें लागे. त्यामुळें गरज असूनही लोक कामावर जातनासे झाले. तेव्हां सरकारनें एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
****

चौकशी-समिती नेमली. तिच्यापुढें ' सार्वजनिक काकां 'नीं ' सार्वजनिक सभे ' तर्फे साक्ष दिली आणि रयतेची कहाणी निर्भयपणें मांडली. काकांच्या ह्या साक्षींचा गौरव समितीच्या अध्यक्षांनीं मुद्दाम केला.

एवढ्यावरच न थांबतां, काकांनीं थेट इंग्लंडपर्यंत हें दुष्काळाचें गाऱ्हाणें नेलें. कारण त्या वेळीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें इंग्लंडच्या हातीं होतीं. ' हिंदची बादशाहीण ' असा डौलदार किताब धारण करणारी महाराणी व्हिक्टोरिआ लंडनच्या राजवाड्यांत राहात होती. तेव्हां तेथल्या राज्यकर्त्यांच्या कानीं हिंदी प्रजाजनांची दुर्दशा जावी, म्हणून काकांनीं विलायतेंतील वर्तमानपत्रांत लेख प्रसिद्ध केले. असे नुसते शाब्दिक नगारे वाजवून काका थांबले नाहींत, तर त्यांनीं चोहोंकडे हिंडून द्रव्यनिधि गोळा केले, दुष्काळसमित्या स्थापन केल्या, स्वस्त धान्याचीं दुकानें जागोजाग उघडलीं आणि दुष्काळाच्या आगींत होरपळून निघणाऱ्या आपल्या देशबांधवांना वांचविण्यासाठीं रक्ताचें पाणी केलें.

आणि दुष्काळ नसतांना तरी हिंदी शेतकऱ्याची दुर्दशा काय थोडी होती ? गरिबी तर त्याच्या पांचवीला पुजलेली. त्यांत ब्रिटिश सरकारनें त्याला नाना रीतींनीं पिळून काढण्यास सुरुवात केलेली. सरकारी खजिना भरावा म्हणून त्याला दारूची चटक नवीनच लावलेली. खेड्यांतील जुने उद्योगधंदे धुळीस मिळालेले. तेथील स्वयंपूर्ण आर्थिक घडी पार विसकटून टाकलेली. हजारों वर्षांच्या ग्रामपंचायती इंग्रजांनीं उध्वस्त केल्या आणि आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यांच्या हातीं सारी सत्ता केंद्रित केली. ही दुर्दशा काकांच्या डोळ्यांस स्पष्टपणें दिसत होती ; त्या दुर्दशेचीं कारणेंही त्यांनीं बरोबर ताडलीं होतीं आणि ती दुर्दशा दूर करण्याचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपायही ते सरकारला सुचवीत होते. 'दुष्काळ कमिशन' पुढें त्यांनीं जी साक्ष दिली तींत ग्रामपंचायती स्थापन करण्याची कल्पना त्यांनीं मांडली.

इंग्रजांचा न्याय महागडा व दिरंगाईचा. खेड्यांतील लोकांना जाचक व टाकाऊ. म्हणून खेड्यांतील लहान लहान कज्जे तोडण्याचा अधिकार ग्रामपंचायतींना द्यावा, असा आग्रह काकांनीं धरला. १८७८ च्या जानेवारी महिन्यांत त्यांनीं सरकारकडे एक अर्ज पाठवून खेडोपाडीं 'लवाद कोर्टें' स्थापन करण्याची सूचना केली. नुसती सूचना करूनच ते थांबले नाहींत, तर पंचायतींमार्फत तंटे तोडण्याचा मार्ग लोकप्रिय करण्यासाठीं त्यांनीं महाराष्ट्रभर दौरा काढला. पुणें, नगर वगैरे शहरांत अशीं लवाद-मंडळें स्वतः स्थापन केलीं, पुष्कळ वर्षें तीं चालविलीं आणि लोकांचे हजारों रुपये वांचविले. सरकारनें पुढें खेड्यांतील तंटे तोडण्यासाठीं मध्यस्थ नेमण्याची योजना शेतकी-कायद्यांत केली.

१८७८ सालीं कोंकणांतील शेतकऱ्यांवर सरकारनें कांहीं बोजे लादले. भंडारी लोकांवर नवीन कर बसविले. तिकडे काकांचें लक्ष गेलें. त्यांनीं सर्व प्रकारची बारीक माहिती मिळविली आणि सरकारला योग्य उपाय सुचविले. शेतसारा कमी करा, लवाद-मंडळें स्थापा, शेतकऱ्यांना थोड्या व्याजानें कर्जें द्या, त्यांच्यामध्यें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करा, वगैरे सूचना काकांनीं सरकारला केल्या. त्यांत त्यांची शेतकऱ्यां-विषयींची कळकळ आणि खोल अभ्यास करण्याची पद्धत दिसून येते. ती पाहून सरकारनें त्यांची तारीफ केली आणि त्यांच्या बऱ्याच सूचनांचा स्वीकार करून एक कायदा केला. तो कायदा जनतेला समजावून सांगण्यासाठींही काकांनीं पुढाकार घेतला. खरा पुढारी असा असतो !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

राजवाड्यांतील संस्थानिक असोत नाहीं तर झोपड्यांतील शेतकरी असोत, त्यांच्यावर अन्याय होत आहे असें कळतांच काका त्यांच्या साहाय्यास धावत. वृत्तपत्रकार असोत किंवा वकील असोत, सरकारनें त्यांच्यावर बडगा उचललेला आहे असें कानीं येतांच त्यांना हात देण्यासाठीं काकांचे पाय तिकडे वळत. काकांनीं १८७८ सालीं वर्तमानपत्रकारांची परिषद भरविली आणि तीही कलकत्ता येथें. कारण तेथेंच वृत्तपत्रांच्या मुस्कटदाबीचा कायदा सरकार घडवीत होतें. त्या कायद्याचा निषेध कलकत्त्याच्या संपादक परिषदेनें केला. तसाच निषेध करण्यासाठीं काकांनीं मुंबई येथेंही संपादकांची एक परिषद भरविली. "नेटिव्ह वर्तमानपत्रकारांच्या मोकळिकेविरुद्ध कायदा" झाला आहे. त्यामुळें "ह्या कॉन्फरन्सचे कामास मोठें महत्त्व येईल. हल्लींचे प्रसंगीं उदासीनता उपयोगी नाहीं." अशी कळवळून हाक काकांनीं जाहीर विनंती-पत्रानें संपादकांना दिली. मुंबईची परिषद ता. २९ मार्च, १८७८ रोजीं भरली. तिनें काकांचे आभार जाहीरपणें मानले.

जसे वर्तमानपत्रकार, तसेच वकीलही बुद्धिमान्, पाश्चात्य विद्या शिकलेले आणि समाजाच्या अग्रभागीं असलेले. पण त्यांनाही भरडून काढण्यास इंग्रज सरकार तयारच होतें. १८७८ सालीं जुलै महिन्यांत सुरत येथें एक दंगा झाला. तो तेथील वकिलांच्या चिथावणीनें झाला असा संशय सरकारास आला. त्याबरोबर सरकारनें वकिलांना धारेवर धरलें. त्या वकिलांचें वकीलपत्र घेण्यास कोण वकील पुढें येणार? कारण वकिलांचें पोट सरकारी कोर्टांवरच चालावयाचें. पण काकांना सरकारची डर कशी ती वाटतच नव्हती. ते तांतडीनें सुरतेस गेले. त्यांनीं तेथील वकिलांची बाजू छातीठोकपणें मांडली आणि त्यांची कैद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वांचविली. विशेष म्हणजे, हें सर्व करतांना त्यांनीं एका पैशाचीही आशा धरली नाहीं. स्वतःचा पैसा व स्वतःचा वेळ मोडून ते सार्वजनिक कार्यांत निर्भयपणें पडले. आणि म्हणूनच ते 'सार्वजनिक काका'! केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर सर्व हिंदुस्थानची जबाबदारी आपल्या डोक्यावर आहे, असें मानून बुडत्याला काढण्यासाठीं, वांधलेल्याला सोडविण्यासाठीं आणि आर्तांचीं साकडीं फेडण्यासाठीं ते तनमनधनानें झटत. त्यासाठीं सर्व देशभर ते दौरा काढीत.

ह्या त्यांच्या सर्व अलौकिक गुणांचा कळस म्हणजे वासुदेव बळवंतांची वकिली!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



क्रांतिकारकांचा पाठीराखा

पिसाळलेला मदोन्मत्त हत्ती सैरावैरा धावत सुटला आणि पायांखालीं सापडेल तें चेंगरून-चिरडून टाकूं लागला, म्हणजे सारे प्राणी भयानें धूम पळतात. त्याच्या गंडस्थळावर आवेशानें झेप घालतो काय तो एक सिंहच! मस्त हत्ती कोणाला केव्हां सोंडेंत घेऊन हवेंत झुगारून फेकून देईल आणि जमिनीवर आपटून चेंदामेंदा करील ह्याचा नेम नसतो. तसाच स्वैरपणा व क्रूरपणा इंग्रज सरकारनें त्या वेळीं चालविला होता. शेतकऱ्यांचे हाल दुष्काळांत वाढलेले असतांनाही सरकार दिल्ली-दरबाराची दिवाळी साजरी करीत होतें. त्यामुळें जाणत्या व तडफदार तरुणांच्या जिवाची लाहीलाही होत असे. त्यांतील अग्रगण्य तरुण म्हणजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

वासुदेव बळवंत फडके! ब्रिटिश सरकार नष्ट केल्याशिवाय येथील जनतेला सुख लागणार नाहीं, असा त्यांचा ठाम सिद्धान्त. त्यासाठीं त्यांनीं एकट्यानें होईल तितके ब्रिटिश सत्तेला धक्के दिले. पण जनतेचें स्वातंत्र्य जनतेनेंच मिळवावयाचें असतें, तें एकट्या दुकट्या व्यक्तीचें किंवा वर्गाचें काम नव्हे, हा अनुभव अद्याप यावयाचा होता. समुद्रावर उड्डाण करणारा हनुमान एकच; पण रामालाही आपलें सर्व सैन्य समुद्रापलीकडे नेण्यासाठीं त्यावर पूल बांधावा लागला आणि नळ, नील, जांबुवंत, इत्यादि स्थापत्य-शास्त्रज्ञांनीं एकएक शिला आणून, ती व्यवस्थित रचून, सर्वांना सोयीचा असा कायमचा पूल बांधला. सार्वजनिक काका, लो. टिळक, वगैरे पुढाऱ्यांचा सनदशीर प्रतिकाराचा मार्ग हा सर्व लोकांना बरोबर घेऊन जाणारा होता. तो सावकाशीचा असला तरी निश्चित यशाचा होता. पण ही सावकाशी वासुदेव बळवंतांसारख्या तडफदार तरुणाला कशी मानवणार? लोकांचीं दुःखें ऐकून ते रात्रंदिवस जळत, बेभान होत, प्राण घेण्यास तयार होत.

"तुम्हीं जर ब्रिटिश सत्तेचा नाश केला नाहीं, तर तुम्हांला सुख लाभणार नाहीं" ही जाणीवही वासुदेव बळवंतांनीं धनगर, रामोशी, वगैरे लोकांमध्यें उत्पन्न केली; पण ती जाणीव सर्व जनतेंत फुलाफळाला येईपर्यंत ते वाट पाहात बसले नाहींत. तितका धीरच त्यांना निघेना. शिवाजी-महाराजांप्रमाणें सरकारवर छापे घालून, त्यांचे खजिने लुटून, त्यांचीं शस्त्रास्त्रें घेऊन, आपण इंग्रज सरकारला थोड्या लोकांनिशीं हैराण करूं व पळवून लावूं अशी त्यांची अटकळ. पण इंग्रजी राज्याची घडण पूर्वीपेक्षां अगदीं वेगळी, व्यापक व आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशी आहे, हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

रानावनांतून व डोंगरकपारींतून राहाणाऱ्या शूरवीर रामोशांना गोळा करण्यासाठीं वासुदेव बळवंतांनीं पायांची चाळण केली आणि हाडांचीं काडें केलीं, पण त्यांना जास्तींत जास्त किती लोक मिळाले? तर दोनतीनशें. "मी माझ्या देशाच्या स्वातंत्र्यास्तव वेळ पडेल तेव्हां सर्वसंगपरित्याग करून लढण्यास सिद्ध होईन" अशी प्रतिज्ञा ते आपल्या अनुयायांना दहींपोह्यांचा द्रोण हातीं घेऊन, घ्यावयास लावीत. खुद्द पुण्यांतही लकडी पुलापलीकडील निर्जन प्रदेशांत, रात्रींच्या अंधाऱ्या वेळेस, ते कांहीं तरुणांना तलवारी, दांडपट्टा, वगैरे शस्त्रांचें शिक्षण देत. त्यांच्याकडून शस्त्रविद्येचें शिक्षण घेण्यासाठीं लो. टिळकही कांहीं दिवस जात. पण त्यांनीं पुढें जनतेला जागृत, संघटित व प्रतिकारशाली करण्याचाच राजमार्ग स्वीकारला. वासुदेव बळवंत मात्र झटपट दिसणाऱ्या मार्गानेंच वेगानें चाल्ले होते. ते गांवोगांव जाऊन टाहो फोडून लोकांना सांगत, "अहो माझ्या सर्व हिंदुस्थानवासी बांधवहो! तुमच्या कल्याणासाठीं मी माझे प्राण पणास लावीत आहें. मला मृत्यु आलाच तर ईश्वराच्या न्यायसभेंत स्वर्गांतही तुमचा वकील म्हणून मी तुमचें दुःख निवारण्याचा प्रयत्न करीन."

ता. २३ फेब्रुवारीची संध्याकाळ. शेतांतील कामें उरकून धामारीचे दमलेले गांवकरी आपापल्या घरीं येऊन बसले होते, विसावा घेत होते. तोंच त्यांच्या कानीं शिंगाची ललकारी आली. तिच्यापाठोपाठ बंदुका उडाल्याचे आवाज ऐकूं आले. त्याच्यामागोमाग वासुदेव बळवंतांचे देशसेवक लुटारू आले. सारा गांव गोंधळला, भेदरला. गांवांतील सावकारांच्या घरांची यथेच्छ लूट दरोडेखोरांनीं निर्धास्तपणें केली. तीन-चार हजार रुपयांची लूट मिळाली. उंची कपडे, दागदागिनेही मिळाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

ते विकून त्यांतून घोडे, शस्त्रें वगैरेंची खरेदी फडक्यांनीं केली. दरमहा चार ते सोळा रुपयांपर्यंत पगार देऊन रामोशांची भरती ह्या "स्वातंत्र्य-सैन्यांत" करण्यांत येत होती. दरोड्यांमध्यें गरिबांना त्रास दिला जात नसे, स्त्रियांचे दागिने घेत नसत, प्राणहानि सहसा करीत नसत. घाटावर व कोंकणांत, दोन्ही ठिकाणीं दरोड्यांमागून दरोडे घालून वासुदेव बळवंतांनीं सरकारला बेचैन करून सोडलें. सात जिल्ह्यांत सरकारी व्यवस्था डळमळूं लागली. पुण्यांत लष्करी कायदा पुकारावा, अशी निर्वाणीची सूचनाही कांहीं वृत्तपत्रांनीं केली.

ह्या 'बंडखोराला' पकडण्यासाठीं इंग्रज सरकारनें साम-दाम-दंड-भेद हे चारही उपाय करून पाहिले. मेजर डॅनियल ह्या पोलिस अधिकाऱ्याची खास ह्याच कामावर नेमणूक केली. पोलिसांची धावपळ चालू झाली. फार काय? सैन्याच्या तुकड्याही इकडून तिकडे दौडविण्यांत आल्या. मुंबई इलाख्यांतील कलेक्टरांची परिषद भरवून सरकारनें आपलें डोकें खूप खाजविलें. वासुदेव बळवंतांना पकडून देणाऱ्यास चार हजारांचें बक्षीस लावलें. त्या सरकारी घोषणेला उत्तर म्हणून वासुदेव बळवंतांनींही प्रतिघोषणा केल्या आणि इंग्रज गव्हर्नरला व कलेक्टरला पकडण्यासाठीं पांच हजार रुपयांचें पारितोषिक लावलें. ह्या घोष-पत्रकावर आपल्या सहीमागें त्यांनीं बिरुद लावलें होतें, "पेशव्यांचा नवा मुख्य प्रधान!"

ह्या 'पेशव्यांच्या नव्या मुख्य प्रधानानें' एक जाहीरनामा काढला. "भयंकर दुष्काळ पडत आहे, तरी मोठमोठीं दुष्काळी कामें सुरू करा. सरकारी कर कमी करा, युरोपिअनांचे लठ्ठ पगार कापा, स्वदेशी व्यापारास उत्तेजन द्या, येथील लोकांना सर्व उद्योगधंद्यांत प्रवेश द्या. प्रत्येकाला काम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व अन्न मिळालेंच पाहिजे, नाहींतर सत्तावन्न सालच्या बंडाची दुसरी आवृत्ति निघेल." अशा खडखडीत सूचना देणारा आपला जाहीरनामा वासुदेव बळवंतांनीं १८७९ च्या मे मध्यें प्रसिद्ध केला. सरकारच्या शब्दाला शब्द, बक्षिसाला बक्षीस व गोळीला गोळी भिडविण्यास वासुदेव बळवंत उभे ठाकले होते. त्या कामीं त्यांनीं आपल्या सुखाची किंवा प्राणाचीही पर्वा केली नाहीं. कैक वेळां त्यांना स्नान करतां आलें नाहीं, जेवणही मिळालें नाहीं, पिण्यास पाणीही नाहीं, अशा स्थितींत निबिडुंगाआड तासन् तास त्यांना लपून बसावें लागे. दोनतीनदा सर्पदंशही झाला. पांचसहादा डोंगराच्या कड्यावरूनही ते पडले. अशा हालअपेष्टा भोगून, अडाणी लोकांना हाताशीं धरून, पारतंत्र्याची पोलादी तटबंदी फोडण्यासाठीं त्यांनीं प्रयत्नांची शिकस्त केली. सरकारला सळो कीं पळो करून सोडलें.

पण इंग्रज सरकार फार बलाढ्य, त्याचें राज्ययंत्र सुव्यवस्थित आणि त्याचीं शस्त्रास्त्रें अद्ययावत् ; उलट वासुदेव बळवंतांच्या क्रान्तीचीं पाळेंमुळें जनतेंत न रुजलेलीं. त्यांतही फितुरी आमच्या रक्तांत भिनलेली. त्यामुळें वासुदेव बळवंतांच्या साऱ्या तळमळीचा व धडपडीचा, शौर्याचा व चातुर्याचा, जागृतीचा व संघटनेचा शेवट शोचनीय झाला. "अशा लोकांकडून माझें कार्य कसें सिद्धीस जाणार?" असे निराशेचे उद्गार त्यांनीं आपल्या अनुयायांबद्दल काढले. तेव्हां ईश्वराचें साहाय्य मिळविण्यासाठीं ते गाणगापूर येथें गेले. तेथें त्यांनीं दत्ताची प्रार्थना केली. त्याबरोबरच रोहिल्यांची पलटण उभारण्याची तयारीही केली. पण लंडनच्या एका वृत्तपत्रानें म्हटल्याप्रमाणें, "वादळाच्या त्वरेनें, दैवाच्या भीषणतेनें आणि कृतान्ताच्या निर्दयतेनें" सरकारी अधिकारी त्यांच्या मागोमाग धावत होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

पावसाच्या सरीवर सरी पडत होत्या. भीमा नदी महापुरानें फुं फुं करीत चालली होती. ती पोहून जाण्याचा हिय्या वासुदेव बळवंतांनीं केला. तितक्यांत एका वृद्ध मुसलमान नावाड्यानें त्यांना आपल्या नावेंतून नेण्याचें धाडस दाखविलें. ता. १७ जुलै, १८७९ रोजीं वासुदेव बळवंत गाणगापूरहून संगम येथें पोचले. त्यांचा पाठलाग दुप्पट जोमानें सरकार करूं लागलें. देवरनावडगी ह्या गांवाजवळील डोंगरांतील बुद्धाच्या विहारांत ते थकून-दमून निजले होते. त्यांचें अंग तापानें फणफणत होतें. अशा स्थितींत, रात्रींच्या अंधारांत, मुसळधार पाऊस पडत असतांना, हिंदी फितुरानें सांगितलेल्या मार्गानें येऊन, मेजर डॅनियल ह्यानें वासुदेव बळवंत ह्यांना, ते झोपेंत असतांना, ता. २० जुलै रोजीं अचानक पकडलें. त्या वेळीं त्यांचें वय ३४ वर्षांचें होतें. चार दिवसांनीं त्यांना सरकारनें पुण्यास मोठ्या बंदोबस्तानें आणलें. आठवडाभर कच्च्या कैदेंत त्यांचा असह्य छळ झाला. इतका कीं त्याला कंटाळून त्यांनीं एकदा आत्महत्येचाही प्रयत्न केला. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं झडत्या व अटका सुरू झाल्या. सरकारी दडपशाहीनें सारे लोक भयभीत झाले. त्यांचें नांव घेण्यास, त्यांच्याबद्दल सहानुभूति दाखवण्यास, त्यांच्या देशभक्तीचा गौरव करण्यास मोठेमोठे लोकही कचरत. मग त्यांची बाजू घेऊन, ब्रिटिश सरकारविरुद्ध उभे राहून, त्यांचा बचाव करण्यास कोणता वकील पुढें येणार?

"मी आलों आहें वासुदेव बळवंतांचें वकीलपत्र घेण्यासाठीं!' अशी गर्जना नरसिंहाप्रमाणें न्यायमंदिरांत निनादली. न्यायाधीश, वकील, पोलीस आणि दाटीवाटीनें बसलेले शेकडों नागरिक चकित झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

ही वीरवाणी कोठून येत आहे हें शोधण्यासाठीं इकडे तिकडे पाहूं लागले. पाहातात तों नखशिखान्त खादीचा पोषाख घातलेली सार्वजनिक काकांची धीरगंभीर अशी सडपातळ मूर्ति ! 'महाराष्ट्राचा बोज ह्या वीरानें आज राखला' असेंच साऱ्या पुणेंकरांना वाटलें ! वासुदेव बळवंतांचें हृदय तर आनंदानें व अभिमानानें भरून आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुहेरी सत्य-निष्ठा



स्तविक सार्वजनिक काकांना सरकारचें भय जास्तच वाटण्यासारखी परिस्थिति होती. त्यांच्यावर सरकारचा डोळा होता. त्यांचें नांव पोलिसांच्या 'काळ्या यादींत' होतें. पुण्यांतील विश्रामबागवाडा व बुधवारवाडा ह्या दोन सरकारी कचेऱ्यांना ता. १३ मे, १८७९ रोजीं एकदम आगी लागल्या. त्या आगींचें मूळ 'सार्वजनिक सभेला' चिकटविण्याचा खोडसाळ प्रयत्न कांहीं इंग्रजी वृत्तपत्रांनीं केला होता. "सार्वजनिक सभेच्या बैठकींत राजद्रोही भाषणें होत असतात आणि त्यांचें फळ म्हणजे वासुदेव बळवंतांचे दंगे किंवा पुण्यांतील वाड्यांच्या आगी." असाही आरोप इंग्रजी वृत्तपत्रांनीं करण्यास कमी केलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. त्यांना सप्रमाण उत्तर काकांनीं लिहून पाठविलें एवढेंच नव्हे, तर पुण्याच्या कलेक्टरकडे एक शिष्टमंडळ घेऊन ते गेले आणि त्याला त्यांनीं बजावून सांगितलें कीं आमच्या सभेवर असे आरोप होतां कामा नयेत. पुढें सरकारला कळून आलें कीं पुण्यांतील वाडे जळले, ह्याचें कारण तेथील एका कारकुनाची हिशेबांतील चार हजार रुपयांची चूक झाकण्यासाठीं त्याच्या मुलानें आग लावली, हें होय. तें कांहीं असलें, तरी सरकारची 'सार्वजनिक काकांवर' वक्रदृष्टि होती ह्यांत कांहीं शंका नाहीं. अशा स्थितींत वासुदेव बळवंतांसारख्या बंडखोराचें वकीलपत्र घेणें म्हणजे आपल्या डोक्यावर निखारेच ओतून घेण्यासारखें होतें. पण काकांनीं न्यायासाठीं, देशासाठीं, माणुसकीसाठीं तें धाडस केलें.

"ह्या तुमच्या धाडसाचा परिणाम काय होईल, हें माहीत आहे काय?" अशी शंका त्यांच्या एका मित्रानें विचारली. काकांनीं त्याला ताडकन् उत्तर दिलें, "काय व्हावयाचा आहे? येऊनजाऊन सरकार रागावण्याची भीति; पण सरकार अतिशय रागावलें तर वासुदेव बळवंतांबरोबर गणेश वासुदेवाला फासावर लटकवील; ह्यापेक्षां सरकारच्या हातीं जास्त काय आहे? आणि त्यालाही माझी सिद्धता आहे."

खटल्याचें पहिल्या दिवसाचें काम संपल्यावर काकांनीं वासुदेव बळवंतांची न्यायालयांतच भेट घेतली आणि त्यांच्याशीं चर्चा केली. सरकारी साक्षीदारांची उलटतपासणी सेशन्स कोर्टांत आपण घेऊं असें त्यांनीं पुढें सांगितलें. पण काकांच्या सत्यनिष्ठेनें देशभक्तीवर मात केली. वासुदेव बळवंतांवर सरकारनें आरोपित केलेले गुन्हे त्यांच्या हातून खरोखरच घडलेले आहेत अशी त्यांची खात्री झाली. त्या आरोपांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा बचाव करणें अनीतीचें आहे असें त्यांना दिसून आलें. तेव्हां त्यांनीं खटल्याचें काम सोडून दिलें. खटल्याचें काम स्वीकारण्यांत सरकारची अप्रीति होती, तर आतां तें सोडण्यांत लोकांची अप्रीति होणार होती. पण काकांनीं आपलें मन सत्याला ग्वाही केलें होतें, बाकी कशालाच ते जुमानीत नव्हते. वासुदेव बळवंतांवर सरकारनें असत्य आरोप लादले असते, तर त्यांचें खंडन करण्याची हिम्मत काकांची होती. उलट, "हो! हो! मीं दरवडे घातले, लुटी केल्या, इंग्रज सरकारविरुद्ध युद्ध पुकारलें. सारे गुन्हे मला मान्य आहेत. पण ते सारे मीं राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं केले आहेत. त्यासाठीं तुम्हीं कितीही जालीम शिक्षा दिली, तरी ती मी आनंदानें सोसण्यास तयार आहें." अशी खरीखुरी व छातीठोक कैफियत देण्याचा काळ अद्याप यावयाचा होता. ती सत्याग्रही परंपरा गांधीजींनीं घालून दिली. पण तोंपर्यंत कायद्याचा कीस काढून आपला बचाव करण्याचीच पद्धत चालू होती.

आणि एकदा बचाव करावयाचा म्हटला म्हणजे वकील काय बोलतील नि काय न बोलतील ह्याला सुमार नाहीं. पुढें सेशन्स कोर्टांत मुंबईचे प्रख्यात वकील श्री. महादेव चिमणाजी आपटे ह्यांनीं वासुदेव बळवंतांचा बचाव करतांना म्हटलें, "आरोपी एकाच विषयाचा छंद घेऊन वेडा झालेला आहे; तापाच्या भरांत त्यानें भलतेंच कांहींतरी लिहून ठेवलें आहे. दरोडेखोरांना पकडून पोलिसांच्या हातीं देण्यासाठींच त्यानें दरोडे घातले होते. सरकारला साहाय्य करण्याचाच त्याचा हेतु होता" इत्यादि. ह्यानंतर पन्नास वर्षांनीं, दुसऱ्या वासुदेव बळवंतांचा बचाव करतांनाही दुसऱ्या एका कायदेपंडितानें त्यांच्यावर असेच सरकारप्रेमाचे व भेकडपणाचे आरोप लादले होते. पण शेवटीं वासुदेव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
****

बळवंत फडके ह्यांनीं आपलें जें वक्तव्य न्यायालयांत केलें, तें मात्र त्यांच्या धीरोदात्त स्वभावास अनुसरून होतें. ह्या देशांत प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्यासाठीं आपण सारे उद्योग केले, असें छातीठोकपणें कबूल करून व साऱ्या दरोड्यांची जबाबदारी स्वतः स्वीकारून महाराष्ट्रांतील ह्या आद्य क्रान्तिकारकानें अशी घोषणा केली कीं "अहो हिंदुस्थानवासी लोकहो, मीं हें सर्व देशासाठीं केलें!" वासुदेव बळवंतांप्रमाणेंच गणेश वासुदेवांचेंही धैर्य व राष्ट्रप्रेम अलौकिक होतें.

देशासाठीं चंदनाप्रमाणें झिजलेला आपला देह सार्वजनिक काकांनीं ता. २५ जुलै, १८८० रोजीं धरणीवर ठेवला. त्यांच्या निधनानिमित्त पुण्यांतील दुकानें, बँका, लवादकोर्टें आणि सार्वजनिक सभा, नेटिव्ह जनरल लायब्ररी, वगैरे संस्थांनीं हरताळ पाळला. त्यांच्या स्मशानयात्रेस शहरांतील सर्व वर्गांच्या लोकांचा मोठा समाज जमला होता. केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानांत ह्या स्वदेशप्रेमी व शूर पुढाऱ्याच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त करण्यांत आलें.

काकांचें कायमचें स्मारक करण्यासाठीं महाराष्ट्रीय जनतेनें निधि जमविला आणि पुणें येथें सार्वजनिक सभेची मोठी इमारत बांधली. राजकीय असो वा सामाजिक असो, कोणत्याही अन्यायाशीं झुंज खेळण्यास 'सार्वजनिक काका' सदैव धावून जात. राजा असो किंवा शेतकरी असो, कोणाचेंही दुःख दूर करण्यास ते पुढें होत. सोळा आणे स्वदेशी असलेली खादी प्रथम वापरणारे आणि महाराष्ट्रांत सार्वजनिक चळवळींचें बीज लावणारे धैर्यवन्त व नीतिमन्त 'सार्वजनिक काका' हे अर्वाचीन महाराष्ट्राचे एक शिल्पकार होत, संजीवक होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्राचे संजीवक

लेखक — दा. न. शिखरे, एम्. ए.

१ लोकमान्य टिळक
२ न्यायमूर्ति रानडे
३ सार्वजनिक काका
४ मालाकार चिपळूणकर
५ 'सुधारक' कर्ते आगरकर
६ साहित्यसम्राट् केळकर
७ महान् मुत्सद्दी ना. गोखले
८ काकासाहेब खाडिलकर
९ 'काळ' कर्ते परांजपे
१० स्वातंत्र्यवीर सावरकर
११ सेनापति बापट
१२ सन्त साने गुरुजी

मूल्य प्रत्येकीं आठ आणे

छत्रपति शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. तें सिंहासन परत मिळविण्यासाठीं असंख्य नररत्नें झटलीं व झगडलीं हें आपलें केवढें भाग्य !

आतां आपल्याला नवा भारत, नवा महाराष्ट्र उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेवलीं पाहिजेत. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नव्या पिढीच्या नसांतून खेळेल तरच आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण करावयाचें म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें नव्या पिढीला सांगणें. महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या बारा विभूतींचीं चरित्रें श्री. शिखरे यांनीं मुद्दाम लिहिलीं आहेत. श्री. शिखरे यांनीं तीं कशीं लिहिलीं असतील हें लिहिणें नलगे.

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar